# वृत्त अहवाल

एसएनडीटी महिला विद्यापीठाचा ६६ वा दीक्षान्त समारंभ दिनांक २० जानेवारी २०१७ रोजी दुपारी १२ वाजता सर सीताराम तथा लेडी शांताबाई पाटकर दीक्षान्त सभागृह, चर्चगेट येथे साजरा झाला.

भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १९१६ साली स्थापन केलेल्या या विद्यापीठाने महिलांसाठी एक दर्जेदार शिक्षण केंद्र निर्माण केले आहे. **शिक्षणातून महिला सक्षमीकरण** हे विद्यापीठाचे ध्येय आहे. **''संस्कृता स्त्री पराशक्ती''** हे बोधवाक्य असलेल्या एसएनडीटी महिला विद्यापीठाने महिला शिक्षण व सक्षमीकरणाची दैदिप्यमान १०० वर्षे पूर्ण केली आहेत.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती माननीय श्री. चे. विद्यासागर राव यानी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवले. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश (सेवानिवृत्त) श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी हे प्रमुख पाहुणे होते. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरु श्रीमती शशिकला वंजारी यांनी विद्यापीठाचा दीक्षान्त अहवाल सादर केला. या दीक्षान्त समारंभात विद्यापीठातील ११,८४४ विद्यार्थिनींना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. या समारंभात १२ अभ्यासक्रमांतील एकूण १७९ पदवी व पदविकांचा समावेश होता. या वर्षी प्रथमच मास्टर ऑफ व्हिज्युअल आर्ट विथ पोर्ट्रेचर, बॅचलर ऑफ कॉमर्स विथ अकौन्टन्सी ॲड फायनान्स, बॅचलर ॲड मास्टर ऑफ स्पेशल एज्युकेशन इन मेंटल रिटार्डेशन ॲन्ड इन्टेलेक्च्युअल डिसेबिलीटी आणि बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी विथ इलेट्रॉनिक्स इंजीनीयरींग या पदव्या दिल्या गेल्या. त्यामध्ये पदव्युत्तर व पीएच. डी. या पदव्यांचाही समावेश होता. या समारंभात एकूण ४७ विद्यार्थिनींना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

या समारंभात गुजरात मधील अहमदाबाद येथील डॉ. अरुणा वणीकर यांना त्यांच्या 'रेनल आणि ट्रान्सप्लांट पॅथॉलॉजी' या क्षेत्रातील त्यांच्या भरीव कामगिरीबद्दल सन्माननीय ''डी. लिट्'' ही पदवी प्रदान करण्यात आली. डी. लिट् पदवी स्वीकारताना डॉ. अरूना वणीकर म्हणाल्या की विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण यांच्यात जवळचे नाते आहे. मानवतेची दृष्टी नसेल तर विज्ञान आणि संशोधन ही अंधच होतील. आज ज्ञानासाठी भारताला जगाकडे पाहाण्याची गरज नाही कारण आज ज्ञानासाठी जगच भारताकडे येत आहे असे म्हणून त्यांनी स्वामी विवेकानंद आणि संत ज्ञानेशवर यांचे दाखले दिले.

न्यायमुर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींना उद्देशून भाषण करताना म्हटले की आज मुलींना सुरक्षित नव्हे तर 'स्वरक्षित' होण्याची गरज आहे. महर्षी कर्वे बरोबरचा आपला अनुभव कथन करीत त्यांनी महर्षीच्या आणि विद्यापीठाच्या स्त्रीशिक्षणासंबंधीच्या कार्याचे कौतुक केले. एसएनडीटी महिला विद्यापीठाचा आवाका इतर विद्यापीठांच्या तुलनेने खूपच मोठा असून या विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठ म्हणून मान्यता देण्याची गरज आहे असेही त्यांनी सांगितले.

नव्या पिढीने जुन्या पिढीची कार्बनकॉपी न बनता पुढे जायला पाहिजे. महर्षीच्या शिक्षणविषयक दुरदृष्टी समजून घेऊन स्पर्धेऐवजी परस्पर सलोखा आणि मित्रत्व यांच्यावर आधारलेली शिक्षण पध्दती अस्तित्वात आली पाहिजे असेही त्यांनी सुचवले.

मुंबई
२० जानेवारी २०१७